# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दुरध्वनी क्र: (०२५१) २७१०१०५, २७२०११६-१२५, फॅक्स नं.: (०२५१)-२७२०१०४
उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर - ४२१००३, जिल्हा ठाणे.

---

जा. क्रं. उमपा/अबांनिवि/ 206/२०१८.
दिनांक:- 08.०६.२०१८.

**विषय:- मा: उच्च न्यायालयाने (जनहित याचिका क्र. १५५/२०११) मध्ये दिलेल्या निर्देशानुसार अनधिकृत फलक व जाहीराती लागणार नाहीत याची दक्षता घेणेबाबत.**

## आदेश

उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध योजना, प्रकल्प इत्यादीची माहिती नागरीकांना व्हावी या दृष्टीने महापालिका कार्यालयात तसेच शहरात विविध ठिकाणी फलक अथवा बॅनर द्वारे जाहीराती प्रदर्शित करण्यात येत असतात तथापी आशाप्रकारे जाहीरात प्रदर्शित करतांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहीरात व फलक नियंत्रण), नियम २००३ मधील तरतुदीचे पालन होत नसल्याची बाब निर्देशनास आलेली आहे. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालयाने देखील जनहित याचिका क्रमांक १५५/२०११ मध्ये शहरात अनधिकृत रित्या फलकबाजी होणार नाही यादृष्टीने कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.

तरी सर्व विभाग प्रमुखानी त्यांच्या विभागाशी संबंधित जाहीरात प्रसिध्द करतांना वरील नियमाची पडताळणी करून त्यानंतरच जाहीराती प्रसिध्द होतील याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे महापालिका मुख्यालयात व इतर कार्यालयामध्ये फलक, स्टीकर, लावण्यात येणार नाही याची देखील दक्षता घ्यावी. यामध्ये हलगर्जीपणा झाल्या त्यासाठी संबंधित सहा. आयुक्त, यांच्यावर जबाबदारी निश्चित करून संबंधित सहा. आयुक्त, यांचेवर नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल यांची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(गणेश पाटील)
आयुक्त
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति:-१. सर्व विभाग प्रमुख, उल्हासनगर महानगरपालिका.

२. सर्व संबंधित सहा. आयुक्त, प्रभाग समिती क्रं. १ ते ४, उल्हासनगर महानगरपालिका.